REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 4 | JANUARY - 2020

# मालवणी कवितेतील कृषिजीवन

प्रा. डॉ. नामदेव विठ्ठल गवळी
मराठी विभाग, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी,
जिल्हा सिंधुदूर्ग, महाराष्ट्र.

कोणतीही प्रचारात असलेली भाषा स्थिर आणि एकरूप नसते. तिच्यामध्ये तिने व्यापलेल्या प्रदेशातील भौगोलिक आणि सामाजिक भेदानुसार अनेक भेद निर्माण होतात. त्यांना बोली भाषा असे म्हणतात. मालवणी ही कोकण प्रदेशातील बोली असून दक्षिण कोकणातील दोडामार्ग सावंतवाडीपासून मालवण, देवगड, फोंडा, वैभववाडी ते राजापूर असा अरबी समुद्राच्या किनारपट्टीचा प्रदेश आणि गोमंतकाच्या तालुक्याच्या सीमेलगतचा प्रदेश हे या बोलीचे प्रभावक्षेत्र होय. 'मालवणी' या बोलीला भाषातज्ञानी 'कुडाळी' असे संबोधले आहे. तथापि मच्छिंद्र कांबळी यांच्या मालवणी नाटकांमुळे या बोलील 'मालवणी' असे संबोधण्यात येऊ लागले. दैनंदिन जीवनव्यवहाराचे साधन म्हणून या बोलीचा वापर केला जातो. किंबहुना, अनेक साहित्यिकांनीही कथा, कादंबरी आणि काव्य, नाटकांसाठी या बोलीचे उपयोजन केलेले दिसते. लोकसाहित्य ही याला अपवाद नाही.

आराड गे मांडके सांजांवने, शेतातली आये घरां येवूंदे..
झापात कोकू काकारता, चिनभिन बगून कलकलता
झाळकेतलो पाको उडांदे, शेतातली आये घरां येवूंदे
शेतातनां आये येतांहां, फणसीत हातपाय धुनां हां।

शेतात गेलेल्या आयेची वाट बगीत दाराच्या हुंबऱ्यावर बसलेल्या किंवा झोपाळ्यावर बसलेल्या या मुलखातील पोरांच्या तोंडातला ह्या लोकगीत. अशी लोकगीतां म्हणी, हुमाणी, गा-हाणी, लोककथा यातुन या बोलीचे वेगळेपण दिसतेच. पण त्यातुन व्यक्त होणारी भूमिनिष्ठ लोकसंस्कृती, परंपरा, कुळाचार, चालीरितींची वैशिष्ट्ये तितक्याच समर्थपणे व्यक्त होतात. दक्षिण कोकणातील लोकगीतांतूनही कृषिसंस्कृतीचे प्रकट दर्शन घडते. बहुतांश वेळा डोंगरातुन खाचरातुन शेती पिकविली जाते. निसर्गाच्या रौद्ररुपाचे अनेक भयगंड या प्रदेशातील लोकांच्या मनात दडून बसलेले असतात. या संदर्भात एक सासुरवाशीण स्त्री म्हणते,

शेत माझं डोंगरी गे तिथं माझं म्हायेर गे।
बाबा माजे इचार करती लेक माजी एकटी गे।।[१]

असे म्हणत आई, बहिण, भाऊ सारेच माहेरचे आपली चिंता करीत आहे. पण चिंतेचे समाधान म्हणून आपणाबरोबर आपले सासू-सासरे, दिर, नणंद, नवरा आहेत. त्यांच्याबरोबर आपण सुखी असल्याचा निर्वाळाही देते.

इथल्या कृषिजन्य जीवनव्यवहारांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे समाजव्यवहारात अनेक प्रकारची जातिभिन्नता असूनही हे व्यवहार परस्परांश्रयी असलेले दिसतात. शेती, अवजारे, घरबांधणी अशा अनेक कामांसाठी विभिन्न लोककारागिरांचे सहकार्य आवश्यक असते. कोकणातील शेतकरी प्राधान्याने धान्याची (भाताची) शेती करतो. त्याचबरोबर नाचणी, कुळीथ, उडीद, चवळी ही पिके घेतो. तसेच उन्हाळ्यात मिरची आणि अन्य भाजीपाला पिकविला जातो. नारळी-पोफळीच्या बागा, काजू, आंबे, फणस, पेरू, चिक्कू, जांभूळ, करवंद ही फळपिके ही मोठ्या प्रमाणात घेतली जातात.

मालवणी कविता आणि शेतकऱ्यांचे जीवन यांचा विचार करता येथील कृषी संस्कृती आणि सागरी संस्कृती या दोहोंचा पर्यायाने विचार करावा लागतो. एका बाजूला शेतीभाती व दुसऱ्या बाजूला सागरी संपत्ती या दोहोंच्या मध्ये इथली माणसे आपले संघर्षमय जीवन व्यतीत करत आहेत. जरी हा मालवणी मुलुख निसर्गसौंदर्याने नटलेल्या व समृद्ध भरभराटीचा वाटला तरी अठराविश्व दारिद्र्य लोकांच्याही वाट्याला आले आहे. महाराष्ट्रामध्ये शेतकरी याला अपवाद कसा? याचे कारण आत्यंतिक जीवननिष्ठा व स्वभाववृत्ती, ग्रामदेवता आणि गाव यांचे अतूट नाते संबंध यामध्ये दिसते. वि. कृ. नेरूरकर यांनी उत्कंठा व इतर कविता पृष्ठ ७७ वर 'घराचे आठव' मध्ये पहिली मालवणी कविता; ठेय झिला घराची आठव रे। मध्ये ते म्हणतात-

बाळो बैल मेलो भोरी रेडी ठकली
जोत कसा फाल्या उब्या रवंतला?
गोर्वाच्या बाजारात जावक होयां मांका
गरज कशी तरी गांठव रे - झिला
कापल्यापासून भात खावनच सरलां
खंडाक धनी येता दारात बोंबयता
पैसे होये घालूक ठकल्यावर त्याच्या
गरज कशी तरी गांठव रे - झिला

कोकणी माणसाच्या कृषिजन्य जगण्याचे वास्तव चित्रीत करताना नेरूरकरांनी मालवणीचा पहिला वस्तुनिष्ठ शेतकरी उभा केला आहे. कोकणी माणसाच्या तत्कालीन जगण्यांचा वास्तववादी चित्र रंगवणारी मालवणी गाणी व अ. ब. वालावलकर यांनी लिहिलेली मालवणी भगवतगीता ही बाब बोलीच्या प्रगतीचे लक्षण ठरते.

मालवणी मुलुख मुसळधार पावसाने बरसत असतो. त्यामुळे या परिसरात भातशेतीचे वर्षातुन पावसाळी एक पीक जोमाने घेतले जाते. ज्या भातशेतीमध्ये पाणी राहाते तेथे उन्हाळी, दुसरे पीक घेतले जाते. त्याला 'वायंगणी शेती' म्हणतात. कोकणी माणूस निसर्गावर अवलंबुन आहे. स्वातंत्र्यानंतर शेतक-यांच्या पाळयकोयत्याची जागा पेन्सीलीने घेतली. शिकलेला कोकणी कुणबी शहरात गेला. त्याला चाकरमानी म्हणू लागला. येथील जमीन डोंगराळ, खडकाळ, पाणथळ व कोरडवाहू, तसेच भावकीच्या वाटणीत छोटे तुकडे.

त्यामुळे शेतीभाती पोटपाणी पिकत नाही. त्यामुळे 'येरे दिसा, भरे पोटा' या अवस्थेत तो चाकरमान्याच्या मदतीवर जगत राहिला. याचे चित्रण नेरूरकर आपल्या काव्यात उभे करतात.

वसंत सावंत यांच्या स्वस्तिक, उगवाई, सागरवेला, माझ्या दारातील सोनचाफ्याचे झाड काव्यसंग्रहातील काही कवितात कृषिदर्शन घडते; पण ते शेतक-यांपासून चारहात दुर उभे राहतात. त्यांची 'बैल' ही कविता माणसाचे पशुवर प्रेम व्यक्त करते.

सह्याद्रीच्या द-याखो-यातुन
दुरकत फिरणारा एक कलंदर बैल
उभ्या शिंगाचा
कोल्या रंगाचा
मस्तीला आलेला
धळणीच्या लाल मातीस खळणीस येणारा

द-याखो-यात डुरक्या देणारा हा बैल दणकट, राकट चौखुर उधळणारा आहे. येथील शेती औतावर अवलंबुन असल्याने तो बैलावर अपार प्रेम करतो. कोकणातील कृषीसंस्कृतीचा संदर्भ असलेल्या लोककथा वसंत सावंतांच्या काव्याचा विषय होतात. 'कोळसुंध्याची गोष्ट', 'कोंबड्याची गोष्ट', 'पावश्याची कहाणी'. या काव्यात त्याचे दर्शन होते.

हाकारे पावश्या
'पावसा गो' असा
झाडात आडोसा
शोधोनिया

'दा. र. दळवी यांच्या 'मालवणी खाजा' (१९८६) यात कोकणचा निसर्ग, शेतीवाडी लोकजीवन इ. चे दर्शन घडविताना कोकणी माणसांचे इरसाल व बेरके नमुने पेश करते',[२] . काटकसरीने संसार करणा-या बापाला चाकरमानी मुलगा घरचा पाडा विकायला सांगतो. त्यावर बाप उत्तर देतो-

धवलो घरचो पाडो, मुला सारखो वाढलो
मुको प्राणी आमच्यासाठी राब राब राबलो.
विकूसाठी त्येंका तू नको लीव वरचेवर
तां मातर होवचां नाय, जितो मी आसांसर
(हेही दिवस जातील)

'तांबड माती' कवितेमध्ये मालवणी कोकम, देवगड हापूस, पायरी, फणस, करवंदे, चिबूड, काकडी, पपनीस, खोबरे, लाकूड सामान, तांदुळ, नारळ, शहाळी इ. कोकणचे फळ विशेष व इतर उत्पादने येतात.

**लोकजीवन प्रतिबिंबीत होवसाठी 'मालवणी भाषेच पीठ नी भावनांचो गुळ/वाक्यप्रचार, म्हणी ह्येंचो आल्याचो रस/कालवून केलेला ह्यो मालवणी खाजा... (प्र.४७) अशा शब्दात कवींनी आपल्या मालवणी कवितांचे वर्णन केले आहे**

**१९६० नंतर आपल्याभोवती खाऊजा संस्कृतीने विळखा टाकला. 'जागतिकीकरणातून येणा-या आर्थिक सुबत्तेच्या नावाखाली शेतकरी कसा भरडला जात आहे? सरकारी उदासीनता सावकार संधीसाधुपणा, राजकारण, भ्रष्टाचार यात शेतकरी वर्ग पिचत आत्मसन्मान हरवतो'[3] या बदलत्या कोकणच्या परिस्थितिचा वेध प्रवीण बांदेकर, महेश केळूस्कर, अजय कांडर, सतिश काळसेकर, नामदेव गवळी, भाऊसाहेब गोसावी, दादा मडकईकर, सई लळीत, शरयु आसोलकर, वीरधवल परब, मोहन कुंभार, डॉ. अनिल कांबळी यांच्या कवितेतुन येतना दिसतो. प्रवीण बांदेकर यांच्या 'येरू म्हणे' या काव्यसंग्रहातुन शेतकरी शेती पडसार ठेवतो आहे आणि जनावरांचे गोठे रस्त्यांवर तयार झाले आहेत.**

**सगळ्याच बाजारातून नाईलाजानं**
**परतवुन आणल्या गेलेल्या म्हाता-या आणि**
**भाकट गायी**
**निरर्थक भटकत असतात गावात**
**किंवा नुसत्याच असतात बसुन कुठेही**
**थपकल मारून दिवसाच्या दिवस निरूपयोगी**
**संथपणे रवंथ करीत डोळे मिटुन**

**अजय कांडर यांच्या 'आवनओल' या बहुचर्चीत काव्यसंग्रहात कृषिजन व्यवस्थेचे कष्टकरी पायाच्या दुःखाची गाथा प्रत्ययाला येते. 'आवनओल' हा शब्दच कोकणी मातीतला असुन शेतीशी संबंधित आहे. मातीची ओलच आपल नात आपल्या माणसांशी, मुलुखांशी, आपल्या घराशी जपून ठेवते. शेतक-याचं कष्टकरी जीवन मांडताना.**

**उकरू मी किती**
**शेतामध्ये माती**
**सापडेना (मन मातीवर जडे)**

**यासारख्या ओळी शेतक-यांच्या कष्टाला अंत नाही आणि त्यांच्या कष्टाला मोल नाही. हे सांगताना कधी-कधी तर पेरणीनंतर पाऊस गायब होतो आणि पीक जमिनीतील आवान ओलवर कसबस जीवंत राहत. पीक वाया जाताना-**

**पीक जात आहे आटत जीव कसा कोरडा झाला**
**पिकासाठीच तर उद्याच्या आज मातीत जखडला**
**(किती काळ पाणी जाणार वाया)**



LBP PUBLICATION

लहान वयात कवीने आपल्या आई-वडिलांना शेतात कष्ट उपसताना पाहिलय. आपल्या बोलीत कवीने उपाशीपोटी राहुन सुध्दा गायीलेल्या ओळी आठवतात-

खळ्यावर गोटो
फुकट जाय
कावळी कुत्री .....
सोड गे माय

कोकणातील सत्ताधारी, अर्थसत्ताधारी इथल्या जमिनी हडप करत आहेत. समाजजीवनावरच घाला घालत आहेत. कुठुनतरी हत्ती येतात व कोकणात धुडगुस घलतात. शेताभाताचे पिकपाण्याचे नुकसान करतात हे 'हत्ती इलो' या दिर्घकाव्यात दिसून येते.

"प्रा. भाऊ गोसावी यांच्या मालवणी मुलूखांची कविता या काव्यसंग्रहात शेती आणि शेतक-यांचे जीवन, वास्तव कृषिजीवन आशयाच्या १७ कविता, 'ओढता नांगर, रोहिणी आता कोरडीच गेली, मिरग्याचो पावस, वायंगणी शेती, बांगरपाडो, घे टकरेल इरलां, आई राहिली शेतात, या कवितात शेतकी जीवनाचे वेगळेपण सिध्द करतात."[४]

'सराई'त बांगरपाडो आमचो
ढेक देता
नाचणी-वरी-कुळीथ-मोडता
गाई बघुन पुढे-पुढे धावता
खळयो खणता मेरे उडयता
शिंगाक शिंग 'झुंजा' लावता
खयसुन हेका अवसान चढता?
(बांगर पाडो)

कोकणातील भातशेती, त्यावर आधारित इथली लोकजीवन व लोकसंस्कृती हे सारे कृषीजीवन शेतक-यांची नांगरणी, पेरणी याविषयी कविता त्यांच्या 'भुक' काव्यसंग्रहात येते.

नामदेव गवळी यांची मालवणी बोलीतील कविता वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. त्यांच्या 'भातालय' काव्यसंग्रहात कृषिजीवन वास्तव संदर्भ कवितेचा विषय बनतात. काही विशिष्ट लोकसंकेत, दैवशरणता, भुतखेते, देवचार, दशावताराची लोकनाट्ये, बारापाचाचे मानकरी ही लोकजीवनाचा भाग बनलेली भावप्रवृत्ती कवितेच्या निवेदनाचा भाग बनुन जाते. दोन वेळच्या घासासाठी कराव्या लागणा-या कष्टाची जाणीव आहे.

आमच्या घामट्यावरच येता रुजान सगळा शेत.
आमच्या बरबर ओडी काढता घरचा आमचा ज्वात, आणि हे सांगताना

'दिनारो तो आस्ता, आमी निस्तो घाम गाळतो, हे जगण्यातले तत्त्वज्ञान सांगताना, देसरूढीची देवपाना करून भुताखेतांका गप्प बसयतो.... शेतावयल्या राखनदाराक मानापरमान उपार दितो.

दक्षिण कोकणातील खेड्यातील शेतक-यांचे जीवनदर्शन घडविणारी 'भातालय' ही या अर्थाने प्रतिनिधित्व ठरते. "कोकणी माणसाचे कलाप्रेम नाटकासाठी गावोगाव वाटा तुडवता, साधी राहणी, माश्या भाताचा आहार, मातीची घरे, अंगणातला माटव, पाठीमागचे परडे, खोप, मांगर, आबोलीची रोपटी हे तपशील येतानाच चटका लावणारा शेवट येतो."[3]

मातयेत जगतो मातयेत हसतो जलमाचीच माती करतो
जलमदित्या परमेश्वराक मातयेतच जलम मागतो,
मुलखातील कृषिजीवनाचे चित्रण गवळी यांच्या -
तिका माथोजड जाले तेवा वळेसार
ओटीपोटी पोटरीक भाताचा केसार (रास)
वादळात दमली झाडा नी पेडा
भिजलली पाखरां कुडकूडतहंत
न्हयकडे थावतत झरे नी व्हाळ
पेरलेली भाता लुसलुसतहंत
(पावस)
कवळा कितीय तोडली तरी झाडाक पाली फुटताना?
घामाक वाळी लागली तरी कुणग्यात थोडा पिकताना?
(पाली)
भातात ढॉर दिसतीत तर धापो करून टाकतलय
बाबग्यान घातलो माराचे भय
ती आपुन पळाल्लो वय पेचून कवळकाडीत
तेवा फुत्फुत् नी काकनांचो आवाज येय (फकाणा)
ओसरेओसरेनी पाट व्हवतत पानयाची कोनाक किंमत नाय
कवाते फुटले, केळी पॉसावले भाजीपाल्याक मरान नाय
(धरणान बदाललो गाव)
आता आपुनच आपली कु-हाड
घासुघासुन ठेवक व्हयी
खताबिता बियाफिया
मापूजोकून घेवक व्हयी (वळेसार)

'राखण' ही कविता असंच वास्तवदर्शी चित्र उभं करते. शेतक-याचा एक जगण्याचा भाग शेतातील राखण पण त्यावेळी अनुभव कवी व्यक्त करतो तेव्हा ती अवघ्या आयुष्याचीच राखण बनते.



LBP PUBLICATION

सगळाच कसा भिनभिनसा हिंव निस्तो माळोभर
आसाननसान काडी ओढता माळेकरी डब्यावर (राखण)

शेतीच्या तुकडा तुकड्यानी विभागलेला शेतकरी यांचे शोषण सत्ता कशी करते ते सांगताना,

हत्तीनी डोंगराचे सर्वे केले
हत्तीनी सातबारा नावांर केले
हत्ती शोधतात नवे गाव
मस्तकावर घालीत घाव (हत्ती यिले)

कवी विरधवल परब यांच्या 'मम म्हणा फक्त' या काव्यसंग्रहात कोकणातील बदलत्या सामाजिक परिस्थितीचे चित्रण येते,

कर्ज घ्या राव शेतीसाठी
ट्रॅक्टर घ्या
पॉवरट्रिलर घ्या
तेवढ्यासाठीच हात जोडून उभ्या आहेत
या आमच्या बिगरशेती ग्रांमीण पतसंस्था
(कर्ज घ्या शेतीसाठी)
कांदा फेकून द्या
टोमॅटो फेकून द्या
दूध ओतून टाका रस्त्यावर
नागवे व्हा
दाती तृण धरून शरण या
(श्री हु च्च केंद्रविकेंद्रीकरण प्रथमोध्यायम)
आता ढ्वारा तरी चरवक पूर्वीसारखी जागा खय रहाखलीहा
सगळीकडे जेथे तेथे गडगे उबे खतहत

झिल म्हणता बापाशीक
घरभाट ठेवन, बाकीचा सगळा इकून टाक
भूसारी मालाचा दुकान काढूया
नायतर मायनिंगाक लावक डंपर घेवया
मगे बग पैशाकडे पैसो कसो जाता तो
बीयर शॉपी आनी चायनीजचा हॉटेल काढला तर
पैसे कमावक आनकीन खयं जावक नको
पावळेचा पानी एकदम पाष्ठाक जायत बग.
(बा देवाऽऽ म्हाराजा गवळदेवा)

**१९६० नंतर खाऊजा संस्कृतीने विळखा टाकला. त्यातुन सरकार, पाऊस, आकर्षक जीवनशैली, जीवनभोग यातून शेतीची मॅरमर्यादा कशी विस्कटून गेली याचे चित्रण परब यांची कविता करते.**

**कवी अनिल धाकू कांबळी यांची कविताही शेतक-याचे वास्तव आपल्यासमोर उभी करते.**

**ही कोणती कीड फवारली जातेय वा-याबरोबर**
**जी भुईसपाट करीत चाललीय उभी पिकं ....**
**अन मेंदू पोखरीत फैलावत चाललीय मनामनांतून अनिर्वेध**
**वारे वाहताहेत.**

**मोहन कुंभार यांचा जगण्याची गाथा या काव्यसंग्रहातुन एक नवा जीवनसंघर्ष आपल्या समोर येतो.**

**वडीलांनी शेतात लावलेल्या**
**बुजगावण्याकडे बोट दाखवून**
**माझी मुलगी म्हणते**
**खूप छान पुतळा उभारलाय आजोबांनी**
**हिरव्यागार शेताच्या बॅकग्राउंडवर**
**(जगण्याच्या गाथा)**

**"या काव्यसंग्रहात शेती ही माणसाच्या उपजीविकेचे पूर्ण साधन नाही. त्यामुळे माणूस शहरातील नोकरी धंद्याकडे वळतो. अलिकडे लोक शेती व्यवसायाकडे न वळता इरत छोटे-मोठे काम करून पोट भरतात."[६] जुन्या काळी राबणारा शेतकरी आज त्यांना शेतात दिसत नाही.**

**मळणीच्या खळ्यावर**
**गवत विस्कटून भाताचे दाणे वेचताना**
**पोटात आगडोंब असायचा**
**आणि मातीच्या फुटल्या कवचात साठवून ठेवलेली पेज**
**त्यावर उतारा**
**गवताचा विस्कटण आणि जगण्याचे दाणे शोधताना**
**अवघ आयुष्यच आटत जायचं खापरातल्या पेजेसारखं**
**(गतकाळ)**

**त्यांच्या 'बी', 'मळणी होताना आयुष्याची', 'माणसाच जागतिकीकरण', 'गाव आणि शहराच्या रिमिक्समध्ये मी', 'आपण आता स्मशानात' या कवितेतून शेतकरी जीवनाची वाताहात व जीवनातील प्रक्षोभकता व्यक्त होताना शेतक-यांची घुसमट अनेक कवितातुन येताना दिसते.**

मालवणी मुलुखातील शेतक-यांची जीवनविषयीच्या कवितेचा शोध घेताना कृषिसंस्कृती बरोबरच मत्स्यसंस्कृतीचाही विचार करावा लागतो. समुद्रकिनारपट्टीलगत असणारे शेतीजीवन व कोळी बांधवाचे मच्छिमारी यावरची कविता हवी तशी अजून मालवणीत उतरली नाही. काही कोळीगीते मात्र मराठीमध्ये लोकप्रिय झालेली दिसतात.

सद्या मालवणी मुलुखातल माणुस हा बदलत असून तुकड्याची शेती असल्याने तो भातशेती करेनासा झाला आहे. काहींनी आपल्या जमिनी विकून शहर गाठले आहे. तर काहींनी देवगड, मालवण, शिरोडा, वेंगुर्ला या किनारपट्टीलगत आपल्या घराभोवती पर्यटन केले आहे. कोकणातील धरणे, जैतापुर प्रकल्प, मायनिंग, रेती उद्योग यामुळे काही नवे प्रश्न व संघर्ष या शेतक-यांपुढे आहेत. कोकणातल्या मोठ्या नदीच्या किनारी ऊस उत्पादन होऊ लागल्याने, जास्त टन ऊस उत्पादन निघेल, तर पतसंस्था कर्जपुरवठा करतात या आशेवर शेतकरी जगत आहे. पण दुस-या बाजुला सरकार ते साखर कारखाने उसाला भाव न देता शेतक-याला कोंडीत पकडत आहे. हा नवा पेच कोकणातील शेतक-यांसमोर येत आहे.

कोकणामध्ये कडधान्याची किरकोळ स्वरूपात पिके घेतली जातात. अल्पभुधारकाला शेती न परवडण्यासारखी आहे. ज्यांकडे जमिनी आहेत अशी बागायतदार मंडळी आंबा बागायती करीत आहेत. हे बागायतदार ब-यापैकी आपल्य मालाला चांगला भाव असल्याने श्रीमंत शेतकरी आहेत. नारळी, पोफळी व काजु बागायतदार हेही कोकणामध्ये ब-यापैकी शेती करत आहेत. फळे, फुले, मध, डिंक, वनौषधी यांद्वारे देखील कोकणी माणूस उपजिवीका करत आहेत. या सा-या शेतकरी जीवनाविषयीचा विचार मालवणी कवितेत येणे आवश्यक आहे. तरच ती अधिक परिपक्व आणि वैभवशाली बनेल असे वाटते. कोकणातील मत्स्य शेती व सागरीकिनारपट्टीलगतचे लोकजीवन अलिकडे कवितेत येऊ लागले आहे.

मालवणी मुलुखातील माणसाचे शेती व निसर्गाशी असलेले अतुट नाते आहे. इथले देवधर्म, देवदेवस्की, नितीकल्पना, संकल्पना, गावरहाटी आणि रुढीवहिवाटी याचे चित्रण या कवितेत येऊ लागले आहे, इथला ग्रामीण परिसर आता बदलू लागला आहे. इथली भाषा संस्कृती आणि समाजजीवन या मालवणी बोलीतून उतरत आहे आणि ही मालवणी कविता नव्या आशय आविष्काराने समृध्द होत आहे. असे म्हणावेसे वाटते.

### संदर्भ ग्रंथः

१. मालवणी लोकगीते - डॉ. बाळकृष्ण लळीत
२. मालवणी खाजा - दा. र. दळवी
३. पुढल्या हाका - संपा., प्रवीण बांदेकर, गोविंद काजरेकर
४. मालवणी मुलुखाची कविता - प्रा. भाऊसाहेब गोसावी
५. भातालय - डॉ. नामदेव गवळी
६. जगण्यची गाथा - मोहन कुंभार